RNI No. MAHBIL/2009/35827

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ७, अंक ३८] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २३-२९, २०२१/आश्विन १-७, शके १९४३ [पृष्ठे ११, किंमत : रुपये १५.००

प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

प्रस्तावित योजनांची अधिसूचना

No. MSETCL/CO/P&S/Scheme-III/P.N./5449

विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/प्र.क्र.३१२/ऊर्जा/४, दिनांक २४ ऑगस्ट २००६ (**शासकीय राजपत्र,** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनांचे काम हाती घेण्याचे प्रस्तावित करीत आहे. या सर्व अधिकारांचा वापर प्रस्तावित योजनेतील विजेचे पारेषण, वितरण अगर म.रा.वि. पारेषण कं. मर्या. च्या समन्वय, संचलन व सुव्यवस्था या कामाकरिता पारेषण कंपनीद्वारे करण्यात येईल. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना त्या भागातील अस्तित्वात असलेल्या वीज ग्राहकांच्या वाढत्या विजेची गरज पुरविण्यासाठी व नविन ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी, तसेच विद्युत निष्कासन व्यवस्था/विद्युत प्रणाली सक्षम करण्यासाठी आहे.

(१) पालघर जिल्ह्यात ४००/२२० के.व्ही. वेळगाव जीआयएस उपकेंद्र उभारणे. (*i*) ४००/२२० के.व्ही., ३ x १६७ रोहित्र GIS बे सह उभारणे-३ नं. (*ii*) ४००/२२० के.व्ही., १ x १६७ अतिरिक्त रोहित्र GIS बे सह उभारणे-१ नं. (*iii*) प्रस्तावित ४०० के.व्ही., वेळगाव उपकेंद्रासाठी, ४०० के.व्ही. GIS वाहिनी बे उभारणे-४ नं. (*iv*) प्रस्तावित ४०० के.व्ही. वेळगाव उपकेंद्रासाठी २२० के.व्ही. GIS वाहीनी बे उभारणे -१० नं. (*v*) प्रस्तावित ४०० के.व्ही. वेळगाव उपकेंद्रासाठी खालील वाहिनीचे काम उभारणे. (अ) ४०० के.व्ही. तारापूर - कुडूस वाहिनीच्या दोन्ही पथावर (पथ १ व २) नॅरोबेस बहुपथ मनो-यावर लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ३ कि.मी. (ब) २२० के.व्ही. बोईसर (PG)—बोरीवली (वरील पथ) वाहिनीवर नॅरोबेस बहुपथ मनो-यावर लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ३ कि.मी. (क) २२० के.व्ही. डहाणू - घोडबंदर पथ १ व २ च्या दोन्ही पथावर नॅरोबेस बहुपथ मनो-यावर लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ५ कि.मी. (ड) २२० के.व्ही. डहाणू - वर्सोवा (वरील पथ) आणि २२० के.व्ही. बोईसर (PG)–वर्सोवा (खालील पथ) वाहिनीवर नॅरोबेस बहुपथ मनो-यावर लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ५ कि.मी. या योजनेचा अंदाजित खर्च रु. ४७७४६.५८ लाख इतका आहे.

(२) अस्तित्वात असलेल्या ४०० के.व्ही. कळवा-पडघे एकपथ वाहिनीचे (पथ I & II) द्विपथ वाहिनी (दोन्ही पथ) मध्ये रुपांतर करणे. (*i*) ४०० के.व्ही. कळवा-पडघे पथ क्र. II एकपथ वाहिनी त्याच मार्गिकेचा वापर करून द्विपथ वाहिनी उभारणे-३० कि.मी. (*ii*) ४०० के.व्ही. कळवा-पडघे पथ क्र. I एकपथ वाहिनी त्याच मार्गिकेचा वापर करून द्विपथ वाहिनी उभारणे-३० कि.मी. (*iii*) ४०० के.व्ही. कळवा-पडघे पथ क्र. II लिलो पद्धतीने आंतर जोडणी करणे - १.५ कि.मी. या योजनेचा अंदाजित खर्च रु. ५६३४१.५२ लाख इतका आहे.

(३) ठाणे जिल्ह्यात ४००/२२० के.व्ही. कळवा जीआयएस-I उपकेंद्र उभारणे. (*i*) ४००/२२० के.व्ही., ३ × १६७ एम.व्ही.ए., रोहित्र-३ नं., १ अतिरिक्त रोहित्र (आयसीटी) सोबत एच.व्ही. आणि एल.व्हि.बे सह उभारणे. (*ii*) ४०० के.व्ही. बे एकूण-४ नं. आणि २२० के.व्ही. बे एकुण - ८ नं. (अ) ४०० के.व्ही. बे-३ नं. लाईन बे आणि १ नं. इंटरकनेक्शन बे.(ब) २२० के.व्ही. बे - ७ नं. (२२० के.व्ही. मुलूंड -I, २२० के.व्ही. मुलूंड-II, २२० के.व्ही. सालसेट-III, २२० के.व्ही. सालसेट-IV, २२० के.व्ही. सिमेंस, २२० के.व्ही. बोरीवली आणि २२० के.व्ही. टिफील) वाहिनी बे आणि १ इंटरकनेक्शन बे जीआयएस-I आणि जीआयएस II उपकेंद्र दरम्यान उभारणे. (*iii*) ४०० के.व्ही. रिॲक्टर बे-१ नं. (*iv*) कळवा येथे प्रस्तावित जीआयएस-I करीता ४०० के.व्ही. केबलचा वापर करून ४०० के.व्ही. पारेषण वाहिन्यांची पुनर्रचना करणे. (*v*) कळवा येथे प्रस्तावित जीआयएस-I करीता २२० के.व्ही. केबलचा वापर करून २२० के.व्ही. पारेषण वाहिन्यांची पुनर्रचना करणे. (*vi*) भूमिगत केबलद्वारे २२० के.व्ही. वाहीन्या हलविणे. या योजनेचा अंदाजित खर्च रु. ७९११४ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असलयास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती अधीक्षक अभियंता (योजना-I), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई,
दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

रविंद्र चव्हाण,
संचालक (प्रकल्प) (प्रभारी).

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

सूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

क्रमांक – सिडको/प्लॅनिंग/बीएन-१२४४२

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (येथुन पुढे 'उक्त अधिनियम' असा उल्लेख केलेले), च्या कलम ११३ च्या उप-कलम (३ए) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने अधिसुचना नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रआरपीवी.११७१/१८१२४/११३/११-डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ आणि अधिसुचना नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. आरपीवी.११७३-II-आरपीसी, दिनांक १६ ऑगस्ट १९७३, याद्वारे – शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (यापुढे 'महामंडळ' असा उल्लेख केलेले) नवी मुंबईतील विनिर्दिष्ट ठिकाणातील समाविष्ट उक्त क्षेत्राकरिता नवीन शहर विकास प्राधिकरण आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या उप-कलम २ मधील अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र.११७५/३६५/वीयुडी-५, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ द्वारे मंजूर केलेल्या नवी मुंबई विकास आराखड्यात वेळोवेळी फेरबदल मंजूर केले आहेत. शासनाने मंजूर केलेले शेवटचे फेरबदल संदर्भ क्र.टिपीएस-१२१८/३७३३/प्र.क्र.९४/२०/नवि-१२, दिनांक २८ जून, २०२१ अनुसार आहेत.

आणि ज्याअर्थी, महामंडळास खारघर व्हॅली गोल्फ कोर्स लगत रहिवासाचे प्रयोजन करण्याकरीता निवासी जमीन वापराची आवश्यकता असल्यामुळे नवी मुंबई विकास आराखडयात सुधारणा करावी लागत आहे.

आणि ज्याअर्थी, मंजूर नवी मुंबई विकास आराखडयाप्रमाणे खारघर व्हॅली गोल्फ कोर्सच्या दक्षिणेकडील जमिनीची भूपातळी समुद्र सपाटी पासून ३० मीटर पेक्षा जास्त असली तरी गोल्फ कोर्स लगत असल्याने रहिवासी प्रयोजनाला भरपूर वाव आहे.

आणि ज्याअर्थी, महामंडळाच्या खाली नमूद अनुसूचीमध्ये दर्शविलेली नवी मुंबई विकास आराखडयातील जमीन निवासी वापरासाठी विकास करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव दिनांक ०५ ऑगस्ट २०२१ रोजीच्या संचालक मंडळाच्या ६३१ व्या बैठकीतील ठराव क्र.१२४४२ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.

अनुसूची

नवी मुंबई विकास आराखडयात करण्यात येणा-या सुधारणा दर्शविणार तक्ता

	स्थळ	अंदाजे क्षेत्रफळ	मंजूर विकास आराखडयातील विद्यमान भूवापर	विकास आराखडयात सुधारणा करण्यात येणारा भूवापर
१)	निर्देशित जमिनी सभोवताल (अ) उत्तरेकडे २४ मी. रूंद रस्ता, खारघर व्हॅली गोल्फ कोर्स (ब) पश्चिम आणि दक्षिणेकडे प्रादेशिक उद्यान प्रभागातील डोंगर रांगा (क) पूर्वेकडे सेक्टर -६, खारघर, कॉन्व्हेंट ऑफ जीसस आणि मेरी हायस्कूल,			
२)	क्षेत्रफळ	६.५९ हेक्टर	प्रादेशिक उद्यान प्रभाग	निवासी
३)	उक्त उल्लेखित जमीन सर्व्हे क्र.४५७(पि), मौजे खारघर, तालुका पनवेल, जि. रायगड येथील असुन भूपातळी समुदसपाटी पासुन ३० मी. पेक्षा अधिक आहे.			

नोट :-

उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या जमिनीचे क्षेत्र व त्याची सीमा प्रत्यक्षात जागेवर तपासणी व सिमांकनानुसार राहील.

आता म्हणूनच, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या उप-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महामंडळाने याद्वारे, उक्त विकास आराखडयामध्ये योग्यरितीने सुधारणा/फेरबदल पार पाडण्याचा त्यांचा उद्देश आणि अनुसूचीमध्ये उल्लेख केलेले व्याप्ती करीता सूचना प्रसिद्ध आणि निर्गमित करण्यात येत आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या उप-कलम (१) च्या अनुसार महामंडळाने महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत उक्त विनियमांमध्ये प्रस्तावित सुधारणा/फेरबदल संदर्भात जनतेकडून सूचना व आक्षेप मागविण्यात येत आहेत. या सूचना/हरकती महामंडळाच्या अतिरिक्त मुख्य नियोजनकार (विकास योजना), यांच्या ४ था मजला, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथील कार्यालयात पोहोचल्या पाहिजेत.

नवी मुंबई विकास आराखडयात प्रस्तावित सुधारणा दर्शविणारा नकाशा खाली नमूद कार्यालयातील सूचना फलकावर जनतेस बघता येईल.

१) सिडको महामंडळाच्या पंजीकृत कार्यालय, निर्मल, दुसरा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

२) अतिरिक्त मुख्य नियोजनकार (विकास योजना), सिडको भवन, ४था मजला, नियोजन विभाग, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) सह-संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग, कोकण विभाग, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

मुंबई,
दिनांक : ८ सप्टेंबर २०२१.

रविकुमार,
अतिरिक्त मुख्य नियोजनकार (वि.यो.), सिडको.

CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED

NOTICE

No. CIDCO: PLNG/BN-12442

WHEREAS, the Government of Maharashtra has in exercise of the powers conferred by Sub-section (1) of the Section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act"), designated by Notification, Urban Development, Public Health and Housing Department, No. RPB 1171/18124/113/IW, dated the 20th March 1971, as amended by Notification No. 1173/IRPC, dated the 16th August 1973, for the area specified therein as the site for a new town of Navi Mumbai has appointed CIDCO 'City & Industrial Development Corporation of Maharashtra Limited (hereinafter referred to as "the Corporation") as the New Towns Development Authority.

AND WHEREAS, in exercise of the powers conferred by Sub-section (2) of the Section 37 of the said Act, the Government of Maharashtra has sanctioned Modifications to the Final Development Plan from time to time. The last Modification sanctioned by the State Government is vide Notification No. TPS:1218/3733/CR-94/20/UD-12 dated 28th June, 2021.

AND WHEREAS, the Corporation considered it expedient to make further modifications in the Final Development Plan of Navi Mumbai (hereinafter referred to as "NMDP") to enable provision of Residential land abutting Kharghar Valley Golf Course (hereinafter referred to as "the land parcel").

AND WHEREAS, areas designated as Regional Park Zone (RPZ) in NMDP on south of Kharghar Valley Golf Course has potential for development as Residential Zone even if the Average Mean Sea Level exceeds 30m.

AND WHEREAS, the Corporation considered it expedient and approved the proposal vide Resolution No. 12442 in the 631st meeting of its Board of Directors on 5th August 2021 to utilize the land parcel for development under residential zone and therefore proposes suitable modification in the NMDP in the manner and extent specified in the Schedule.

SCHEDULE

Statement of proposed modification in Navi Mumbai Development Plan

Location	Approx. Area in Ha.	Present landuse Zone (As per Sanctioned DP)	Proposed Land use zone
1) Land bound by (a) On North - 24 M wide road, Kharghar Valley Golf Course (b) On West & South - Hills in RPZ (c) On East - Sector-6, Kharghar, Convent of Jesus & Mary High School 2) Area of Land Parcel 3) Land Parcel out of Survey no. 457 Mouze Kharghar, Tal-Panvel, Dist-Raigad. AMSL more than 30m	6.59	Regional Park Zone	Residential Zone

Note: The exact boundary/areas mentioned above are subject to site verification and

demarcation and may vary accordingly.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-section (1) of the Section 37 of the said Act, the Corporation hereby publishes notice declaring its intention to carry out the Modifications to the Final Development Plan for Navi Mumbai in the manner and to the extent recited hereinbefore.

In pursuance of Sub-section (1) of the Section 37 of the said Act, the Corporation invites suggestions/objections from any person with respect to the proposed modification not later than one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette. The suggestions/objections shall reach to the office of the Additional Chief Planner (DP), Planning Department, 4th Floor, CIDCO Bhavan, CBD-Belapur, Navi Mumbai- 400 614.

A Plan showing the proposed modification to the Final Development Plan for Navi Mumbai is kept open for inspection during office hours in -

(i) The Registered office of the Corporation at Nirmal, 2nd floor, Nariman Point, Mumbai-400 021

(ii) Office of the Additional Chief Planner (DP), Planning Department, 4th Floor, CIDCO Bhavan, CBD-Belapur, Navi Mumbai- 400 614

(iii) Office of the Joint Director of Town Planning, Konkan Division, 3rd floor, Konkan Bhavan, CBD-Belapur, Navi Mumbai-400 614.

By the Order of Board of Directors of the Corporation,

Mumbai,
Date : 8th September 2021.

RAVIKUMAR,
Additional Chief Planner (Development Plan)
CIDCO Ltd.

जिल्हा परिषद, नागपूर

कृ.जिपना/वित्त/वाले/५३९६

सन २०१९-२० च्या वार्षिक लेख्यांचा जमेचा गोषवारा (पंचायत समितीच्या जमेच्या एकत्रित रकमेसह)

अ.क्र.	हिशोबाचे सदर	अंदाजपत्रक वर्ष २०१९-२०				सन २०१९-२० ची प्रत्यक्ष जमा			
		जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण	जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण
	सुरुवातीची शिल्लक					४१६५७३५२६	३३०८२५५२२३	७८६८९५९००	४५११७२४६४९
१	अ कर				०		०	०	०
२	सामान्य उपकर	३४२२०६२			३४२२०६२	३२४१३३६९	०	०	३२४१३३६९
३	स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान	१५०३९७२१			१५०३९७२१	०			०
४	**जमिन महसूल**	१२९७०२५			१२९७०२५	१०८०४४५६	०	०	१०८०४४५६
५	**पं.स. वाढीव उपकर हिस्सा**				०		०	०	०
६	**जि. प. वाढीव उपकर हिस्सा**	४१४४७५२			४१४४७५२				०
७	**पं.स. प्रोत्साहनपर अनुदान**				०				०
८	**जि. प. प्रोत्साहनपर अनुदान**				०				०
९	**मुद्रांक शुल्क**	१४८६४३०००			१४८६४३०००	३९६३८२०००			३९६३८२०००
१०	**शासनाकडून पाणी पटटी**				०				०
११	**अभिरण शुल्क**				०				०
१२	**वन महसूल**	२५०००००			२५०००००	१२०३०००			१२०३०००
१३	**कर व फी**	५००००००			५००००००	४८१२५६५			४८१२५६५
१४	व्याज	३९००००००			३९००००००	१२३१७५६८			१२३१७५६८
१५	सामान्य प्रशासन विभाग		१५३३७३२७१३		१५३३७३२७१३		१४७५१२३९९९		१४७५१२३९९९
१६	सार्वजनिक बांधकाम	२६५०२३४७	४२८७५५९२०		४५५२५८२६७	३७१९९३१	४४०५७३१३५		४४४२९३०६६
१७	शिक्षण	८००००	६१५२३६१९०६		६१५२४४१९०६	१२५३७४	५८८१४११९१०		५८८१५३७२८४
१८	सार्वजनिक आरोग्य	१२०००००	६०१७८१९७१	२१५१५५९१३	८१८१३७८८४	२८८३९२६	५६८२०५४८७	१९५१४८१३६	७६६२३७५४९
१९	महिला व बालकल्याण विभाग		२७७८४९४५	१६६१२१४१०	१९३९०६३५५		५८७२७१०५	१५८९९५७९१	२१७७२२८९६
२०	ग्रामीण पाणीपुरवठा विभाग		१८४८७५८५८	३४२५८५०००	५२७४६०८५८	८०४०	२०६९८६५५३	८४८७८१९४	२९१८७२७८७
२१	समाज कल्याण विभाग		६२१८८७२२५	८४६५३०००	७०६५४०२२५		६२१८८७२२५	३४२५८५०००	९६४४७२२२५
२२	कृषी	६०६००००	४४०६५३४९	१४५१४८४१०	१९५२७३७५९		४०४७८१४६	१४२६२३९२५	१८३१०२०७१
२३	पशुसंवर्धन	५००००	२०८५४३७१०		२०८५९३७१०		१९९६८९३११		१९९६८९३११

अ.क्र.	हिशोबाचे सदर	अंदाजपत्रक वर्ष २०१९-२०				सन २०१९-२० ची प्रत्यक्ष जमा			
		जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण	जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण
२४	पंचायत	२३७५२५५३	१४९५२५५२७८		१५१९००७८३१	१२०५१६१२	६४५६१३२७८		६५७६६४८९०
२५	लघुसिंचाई	३०५११६८०	९५६७९११२		१२६१११५९२	३८१७६०१७	८०४८१८५८		११८६५७८७५
२६	निवृत्ती वेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ				०	२८४३४०			२८४३४०
२७	संकिर्ण जमा				०				०
२८	जि.ग्रा.वि.यं.		३००००००		३००००००				०
	एकुण महसुली	३०७२०३१४०	११३१७७२४७८७	९५३६६३७३३	१२६५८५११६६०	५१५१८२११८	१०२११९७८०१५	९२४२३१०४६	११६५८५११२५१
	भांडवली								०
	भांडवली भाग-१		२५२४०८०००	२४३५८३५५२	४९५९११५५२		३३५१४५३२५	२४१८१४०८३	५७६९५१४०८
	भांडवली भाग-२				०				०
१	(अ) कर्जे				०	०	०	०	०
२	विभाग २ बिनव्याजी कर्जे				०	०	०	०	०
३	अर्थोपाय हस्तांतरण				०				०
४	अनामत व तसलमात				०	१७५७०६५०५	१२०३८५३४५१	१०९२०६६८०	१४८८७६६६३६
५	निलंबन लेखा	३००००००००			३००००००००	१६४६६५१६			
६	वित्त प्रेषण				०	२१००११२६४	८३३६४६०६६७	४३६८२४४७४	८९८३३७६४०५
	एकुण	३३७२०३१४०	११६५०१३२७८७	११९७२४७२८५	१३१८४५८३२१२	९१७४४६४८३	२००९४६३७४५८	१७१२०७६२८३	२२७०७६१३७०८
	एकुण सुरुवातीचे शिलकेसह					१३३४०२०००९	२३४०२८१२६८१	२४१८१७२१८३	२७२३५८८४८७३

जिल्हा परिषद,नागपूर

सन २०१९-२० च्या वार्षिक लेख्यांचा खर्चाचा अहवाल (पंचायत समितीच्या खर्चाच्या एकत्रित रकमेसह)

अ.क्र.	हिशोबाचे सदर	अंदाजपत्रक वर्ष २०१९-२०				सन २०१९-२० चा प्रत्यक्ष खर्च			
		जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण	जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण
१	(अ) प्रशासन	२०४७६६००			२०४७६६००	१४७५१८८८			१४७५१८८८
२	२०५३- सामान्य प्रशासन		१५३३७३२७१३		१५३३७३२७१३		१५६३६२३२९१		१५६३६२३२९१
३	२२०२ - शिक्षण विभाग	२२८४८५००	५९६७५२११०६		५९९०३७८४०६	११६३१४७४	५४३४८७३९०२		५४५४५०५३७६
४	२०५९ इमारती व दळणवळण	१०२१०७०००	१७००५५९२०		२७२१६२९२०	११०४७८८९	२५३३६४२६२	१०३४९८१७४	४४७११०३२५
५	२७०२ - पाटबंधारे	११६७५०००	९५६७९९९२	११४००००००	२२१३५४९९२	१७२३१३१३	७७५५१२६९	५११६८०९	९९९७१४७१
६	२२१० - आरोग्य	१२२५४१००	४८३८६३९७१	२१४२५५९१३	७१०३७३९८४	१०३५४८४३	४४९६१८०१३	१७०६८८१५४	६३०६६१०१०
७	२२१५ - ग्रामीण पाणी पुरवठा	४१७११६४८	१७०००६८५८	३४२५८५०००	५५४३०३५०६	८४७८७६७	२८५५६५१८१	३२३३०३९४८	६१७३४७८९६
८	२४०१ कृषि	१००४००००	४४०६५३४९	१४५१४८४१०	१९९२५३७५९	८१७६८३१	३८४७२२०५	६७४६१४००	११४११०४३६
९	२४०३ - पशुसंवर्धन	१००३८०००	१९८५४३७१०		२०८५८१७१०	५४४७९४६	१३८२९९१९९		१४३७३९१४५
१०	वने				०		३११००००		३११००००
११	२२२५ - समाज कल्याण	५१७५३०००	६२१८८७२२५	८५५५३०००	७५९११३२२५	६२४७५१५४	८०७११६२६६	८०३५७१०५	९५०८२८५२५
१२	महिला व बाल कल्याण विभाग	४४०८२१५३	२७७८४९४५	७६१२१४१०	१४७९८८५०८	१५१३७०५२	२३५११११०	८७७०१२९१	१२६४२१४५३
१३	पंचायत	५११५२००	१४९६४५५२७८		१५०२४५०४७८	२०८२०७८३३	८१४८०६६४८		१०२३०१४४८१
१४	घसारा निधी	३००००००			३००००००	३००००००			३००००००
१५	निवृत्ती वेतन व इतर भत्ते					४६०११३६			४६०११३६
१६	संकिर्ण				०				०
	एकुण महसुली खर्च	३३६७८१२०१	१०८०९६०५७८७	९७७६६३७३३	१२१२४०५०७२१	४६९३५०२०६	९८१०९४३३४६	८३८२०६८८१	११११८५००४३३

जिल्हा परिषद,नागपूर

सन २०१९-२० च्या वार्षिक लेख्यांचा खर्चाचा अहवाल (पंचायत समितीच्या खर्चाच्या एकत्रित रकमेसह)

अ.क्र.	हिशोबाचे सदर	अंदाजपत्रक वर्ष २०१९-२०				सन २०१९-२० चा प्रत्यक्ष खर्च			
		जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण	जिल्हा परिषद सेस फंड	हस्तांतरीत योजना	अभिकरण योजना	एकुण
	भांडवल								
	भांडवल भाग-१	६२२५००	८४०५२७०००	२१९५८३५५२	१०६०७३३०५२	१०३१४६६	१०९५३३१०५७	११०७४०३०६	१२०७११०८२९
	भांडवल भाग-२								
	(अ) कर्जे					०	०	०	०
	विभाग २ बिनव्याजी कर्जे						०	०	०
	विभाग ३ - अनामत व तसलमात					१२८७७९५०१	८०९८०६२९८	९८७००४०८	१०३७२८६२०७
	एकुण भांडवल					१२९८१८९६७	१९०५१३७३५५	२०९४४०७१४	२२४४३१७०३६
	वित्त प्रेषण					२१००९१२६४	८३३६४६०६६७	४३६८२४४७४	८९८३३७६४०५
	एकुण खर्च	३३७४०३७०१	११६५०१३२७८७	११९७२४७२८५	१३१८४७८३७७३	८०९२६०४३७	२०१३२५४१३६८	१४८४४७२०६१	२२४२६२७३८७४
	शेवटची शिल्लक					५२४७५१५७२	३२७०३५१३१३	१०१४५००११४	४८०९६१०९९९
	एकुण शेवटचे शिल्लकेसह					१३३४०२८००९	२३४०२८९२६८१	२४९८९७२१८३	२७२३५८८४८७३

योगेश कुंभेजकर,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर.

Serial No. M-2144

NOTICE

TATA CONSULTANCY SERVICES LIMITED

Registered Office : Nirmal Building, 9th Floor, Nariman Point, Mumbai 400 021.

Notice is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company have been lost/mislaid and the holder(s) of the said securities/applicants have applied to the Company to issue duplicate certificates.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

Name of the Holders	Kind of Securities and Face Value	No. of Securities	Distinctive Numbers
Sharda Auluck (Decd) & Archna Auluck (Decd).	Equity Shares of Re. 1/- each.	1176	489483265-489483411 978900123-978900416 1970640011-1970640598 480287879-480288025

Ludhiana,

Date : 18th September 2021.

ANIL AULUCK & SUNIL AULUCK.

ON BEHA(LF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.